# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2012-2014

YEAR : 39) 1st September 2014 (No. of Pages 16 ) ( No : 11


# उच्च शिक्षणमंत्री राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी तरी आहेत किंवा उच्च शिक्षण विभागावरील त्यांचे नियंत्रण पूर्णपणे सुटले तरी आहे

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या पुणे येथील बैठकीत संमत केलेला ठराव

**एक** : सन २०१४ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेचा अंमल सुरु झाल्यादिवसापासून १ जून २०१४ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार **सुरु करण्यात आलेले आंदोलन तात्पुरते थांबविण्यात येत आहे.** मात्र असे करीत असतांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी व उच्च शिक्षणमंत्र्यांनी तसेच उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी एकूणच शिक्षकांशी जे विश्वासघाताचे वर्तन केले, लेखी दिलेले शब्द पाळले नाहीत याची तपशीलवार नोंद या ठरावाच्या **परिच्छेद दोन** मध्ये करण्यात आलेली असून शिक्षकांच्या बाबतीत मा. सर्वोच्च न्यायालयाने व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या ३० ते ४० निर्णयांची अंमलबजावणी न करुन या शासनाने त्या निर्णयांची अवहेलना केलेली आहे. राज्य शासनाचे हे कृत्य सरळसरळ घटनाबाह्य असून त्याबाबतचे तपशील या ठरावाच्या **परिच्छेद तीन** मध्ये नमूद केलेले आहे. आचारसंहितेचा कालखंड संपल्यानंतर आंदोलनाचे स्वरूप कसे राहील याबाबतचे तपशील या ठरावाच्या **परिच्छेद चार** मध्ये दिलेले आहेत.

**दोन** : निरनिराळ्या वेळी उच्च शिक्षणमंत्र्यांनी व मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या शब्दांचे पालन करण्यात आलेले नाही. याचे तपशील पुढीलप्रमाणे.:- (१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे दिनांक २४ जुलै, २००९ रोजी एक पत्र (क्र. एनजीसी २००८/२४३/२००८/विशि-१) पाठवून "**विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सूट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसाच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल." असे कळविण्यात आले. पण शासनाने शब्द पाळला नाही.** (२) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ३१ जुलै, २००९ रोजी एक पत्र (क्र. एनजीसी (२००८/२४३/०८)/विशि-१) पाठवून "**विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबिर आयोजित करून कार्यवाही पूर्ण करण्यात येईल." असे कळविण्यात आले. पण शासनाने शब्द पाळला नाही.** (३) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे प्रतिनिधी व मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांची मा. मंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) श्री. राजेश टोपे यांचे समवेत दिनांक २६ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तातील परिच्छेद ५ पुढील प्रमाणे आहे. :- "विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या तरतूदी व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वेगवेगळ्या याचिकांमध्ये (मुख्यतः याचिका क्र. : ५०२२/२००१, क्र. ५३७५/२००१, क्र. ४२६६/२००६) वेळोवेळी पारित केलेल्या आदेशानुसार, **नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील**" असे ठरले. पण शासनाने दिलेला शब्द पाळला नाही. (४) मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेच्या पदाधिकाऱ्यासोबत दिनांक २ मे २०१२ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत काय ठरले होते याबाबतचा शासकीय कार्यवृत्तातील तपशील पुढील प्रमाणे :- **(अ)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे जे निदेश आहेत ते ऐकून झाल्यावर "**सदर बाब अशीच स्वीकृत करावयाचे ठर े.**" असे कार्यवृत्तात नमूद आहे. **(ब)** "उपरोक्त का ावधीती अध्यापकांच्या सेवा आयोगाकडून वरी प्रमाणे सहमती प्राप्त होण्याच्या अधीन **सर्व प्रयोजनार्थ नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून ग्राह्य धरण्याचे ठर े.**" असेही या कार्यवृत्तात नमूद आहे. **(क)** "**याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाल्या नंतर उक्त अध्यापकांना दिनांक ११/१२/१९९९ व दि. १२/०८/२००९ रोजीच्या शासननिर्णयाती तरतुदी विचारात घेऊन त्यांची स्थाननिश्चिती व वेतननिश्चिती करण्यात यावी.**"

---

## Nagpur University Teachers' Association

**MEETING NOTICE : 1**

**DATED : 01.09.2014**

From :
**Dr. A.W.DHAGE**
Secretary, NUTA Sankalp Sahaniwas,
Khare Town, Dharampeth,
Nagpur-444 010

To,
All the members of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. P.B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan wadi, Rajapeth, Amravati 444 601 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- Dr.A.W.DHAGE,**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting 12.00 Noon on Sunday, the 19th October, 2014***

---

असाही स्पष्ट उल्लेख या कार्यवृत्तात आहे. खुद्द **मा. मुख्यमंत्र्यांनी लेखी स्वरूपात मान्य केलेला शब्द पाळण्यात न आल्याचा हा लाजिरवाणा इतिहास आहे.** (५) वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २४ जुलै २००९ रोजीच्या पत्रान्वये उच्च शिक्षण विभागाने दिलेला शब्द पाळल्या गेला नाही; वर नमूद केल्याप्रमाणे त्यानंतर दिनांक ३१ जुलै २००९ रोजीच्या पत्रान्वये उच्च शिक्षण विभागाने दिलेला शब्द पाळल्या गेला नाही; वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २६ ऑगस्ट २००९ रोजीच्या बैठकीत, राज्याचे उच्च शिक्षणमंत्री, मुख्य सचिव यांनी दिलेला लेखी शब्द पाळल्या गेला नाही ; वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २ मे २०१२ रोजी खुद्द मा. मुख्यमंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत त्यांनी दिलेला शब्द पाळल्या गेला नाही.

**तीन** : निरनिराळ्या बाबतीत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या ३० ते ४० निर्णयांचे व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचे राज्यशासनाने पालन केलेले नाही. (१) **मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय** :- दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी, सन २०१३ च्या राज्यशासनाच्या विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) क्रमांक ३४११८ वर, मा. सर्वोच्च न्यायालयाने एक अंतरिम आदेश पारित केला. तो अंतरिम आदेश पुढील प्रमाणे :- "We are of the view that following the UGC Notification/Letter dated 4.11.2008, those teachers who have not passed NET/SET examination but who have completed six years of service as on that date should be entitled to the benefits of **career advancement scheme** only for the purpose of pay-scales. According to us such an interim order for that limited purpose will meet ends of justice." विशेष अनुमती याचिका खुद्द शासनानेच दाखल केली. त्या याचिकेच्या सुनावणीच्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने त्या बाबतीत अंतरिम आदेश दिला. तो आदेश वर नमूद केलेला आहे. या गोष्टीला आता आठ-नऊ महिने होत आलेले आहेत. पण शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करणारा शासन निर्णय अजूनही निर्गमित केलेला नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** (२) मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होण्यापूर्वी **मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळया सात खंडपीठांनी या प्रकरणी निर्णय दिलेले आहेत.** त्यातील पहिला निर्णय हा दिनांक १०.५.२०१३ रोजीचा असून शेवटचा निर्णय दिनांक १७.१०.२०१३ रोजीचा आहे. हे सारेच्या सारे निर्णय या शिक्षकांच्या बाजूचे आहेत. या प्रत्येक निर्णयात तीन महिन्यांचे आंत, चार महिन्यांचे आंत, सहा महिन्यांचे आंत या शिक्षकांना थकबाकी अदा करावी असे मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी आदेशित केलेले आहे. असे असतांना एकाही प्रकरणामध्ये न्यायालयाचा निर्णय अंमलात आणणारा शासन निर्णय राज्य शासनाने आजपावेतो निर्गमित केलेला नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** (३) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर याच प्रकरणात **मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी नऊ निर्णय दिलेले आहेत.** हे निर्णय जरी नऊ असले तरी त्यात याचिका नऊच आहेत असे नाही. बहुतेक निर्णयामध्ये अनेक याचिका आहेत व प्रत्येक याचिकेमध्ये अनेक शिक्षक वादी आहेत. त्यांची संख्या निश्चितपणे काही शेकड्यात आहे. या प्रत्येक निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाच्या या प्रत्येक खंडपीठांनी राज्य शासनाला दिलेले आहेत. या प्रत्येक निर्णयामध्ये तीन महिन्यांत, चार महिन्यांत, सहा महिन्यांत त्यांची थकबाकी त्यांना अदा करा असे राज्य शासनाला आदेशित करण्यात आलेले आहे. जवळ-जवळ सर्वच प्रकरणामध्ये आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या मुदती संपून गेलेल्या आहेत. पण शासन निर्णय निर्गमित झालेला नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** (४) **सारांश काय तर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १८ नोव्हेंबर २०१३ च्या निर्णयाची व उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी दिलेल्या पूर्वीच्या ७ व नंतरच्या ९ निर्णयापैकी एकाही निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाने न करणे हे सरळसरळ घटनाबाह्य वर्तन आहे.** (५) दिनांक १० मे २०१३ रोजी मा. मुख्य न्यायाधीश पीठासीन असलेल्या मुंबई खंडपीठासमोर शासनाच्या वतीने सन १९९१ ते १९९९ या काळात सेवेत आलेल्या नेटसेट मुक्त शिक्षकांच्या बाबतीत "**यातील सर्व शिक्षकांचे वेतन, झालेली वेतननिश्चिती व त्यांना यापूर्वी देण्यात आलेल्या वार्षिक वेतनवाढी यांचे संरक्षण केले जाईल. त्यात कोणतीही कपात (रिकव्हरी) केली जाणार नाही**" असे स्पष्टपणे शासनातर्फे मान्य करण्यात आले होते. १० मे २०१३ च्या मा. मुंबई खंडपीठाच्या निर्णयामध्ये ते पुढील शब्दात नोंदविले आहे. :- "...the Government and the Universities will protect the pay and the pay fixation including increments already paid to the teachers and therefore, there will be no recovery of annual increments which the teachers have already earned. Similarly there will be no recovery of other benefits." बारा महिन्यांपेक्षा जास्त काळ होऊन गेला तरी याबाबतचा शासननिर्णय उच्च शिक्षणमंत्र्यांनी निर्गमित केलेला नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** (६) दोन महिन्याचा पगार बेकायदेशीरपणे कापून घेण्याची बाब अशीच आहे. कोणतीही कारणे दाखवा नोटीस न देता, ज्यांचा पगार आपण कापतो त्यांचे म्हणणे ऐकून न घेता, कायद्याने किंवा नियमाने कोणताही अधिकार दिलेला नसतांना दोन महिन्यांचा पगार थांबवून धरण्याचे आदेश निर्गमित करण्याचे श्री. राजेश टोपे यांचे हे कृत्य निःसंशय बेकायदेशीरच होय. या प्रश्नाबाबत **संघटनेशी चर्चा करा असे मा. न्यायालयाचे आदेश असतांना साधी चर्चा न करणे, महासंघाने दाखल केलेल्या याचिकेवरील १५ दिवसात तुमचे म्हणणे दाखल करा असा मा. उच्च न्यायालयाने दिनांक २० नोव्हेंबर २०१३ रोजी आदेश दिला असतांना तसे न करण्याचा त्यांचा स्वभावजन्य उद्धटपणा हा न्यायालयाचा अवमान करणारा असून त्यांचे हे वर्तन भारतीय घटनेच्या विरोधी आहे.** (७) १ जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना तसेच इतरही अधिकारी व कर्मचारी यांना सेवानिवृत्ती समयी अदा करावयाच्या ग्रॅच्युईटी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० जानेवारी २०१३ रोजी "In the result, the appeal is allowed and the impugned order is set aside. **The cut-off date, i.e. 01.09.2009 specified in G.R.dated 21.08.2009 is declared unconstitutional** " असा निर्णय दिला व त्यामुळे १ जानेवारी २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना ५ लक्ष रूपये व काही शिक्षकांना ७ लक्ष रूपये ग्रॅच्युईटी अदा करण्याचा राज्य शासनाचा भेदभाव करणारा शासन निर्णय रद्द झाला. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाच्या आधारे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या सन २०१३ च्या याचिका क्रमांक ६३६९ मध्ये दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी "We direct the State Government to take a policy decision on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today;" असा निर्णय दिला. चार आठवड्याच्या आत शासनाने धोरणात्मक निर्णय तर घेतला नाहीच पण आकसाने पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाची ही पुनर्विलोकन याचिका दिनांक १३.१०.२०१३ रोजी "The review petition is accordingly dismissed." या शब्दात डिसमिस केली. **तरी अजूनही राज्य शासनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय निर्गमित केलेला नाही.** राज्यशासनाची ही कृती न्यायालयाचा अवमान करणारी असून घटनाविरोधी आहे. **याच संदर्भात दिनांक ४ जुलै २०१४ रोजी सर्वोच्च न्यायालयात प्रधान सचिव उच्चशिक्षण यांना बिनशर्त माफी मागावी लागली.** (८) सन १९९६ नंतर निवडश्रेणीमध्ये गेलेल्या व त्या श्रेणीत पाच वर्षाची सेवा ज्यांनी पूर्ण केलेली आहे, अशा शिक्षकांची १४९४० च्या टप्प्यावर वेतननिश्चिती करण्याचा लाभ न देण्याबाबत

***पुन्हा पुन्हा कोर्ट कचेरी करावी लागू नये म्हणून आमच्या आदेशाचे पालन करण्यासाठी धोरणात्मक शासननिर्णय काढा असा मा. उच्च न्यायालयाने १ ऑक्टोबर २०१३ रोजी निर्णय दिल्यानंतर सुद्धा हे शासन काहीच करीत नाही. उलट रिकव्हऱ्यांची भुताटकी सुरुच राहते याचा अर्थ उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी आहेत किंवा त्यांचे उच्च शिक्षण विभागावरील नियंत्रण पूर्णपणे सुटले आहे यापेक्षा वेगळा निष्कर्ष या घटनाक्रमातून निघत नाही.***

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दिनांक २४ ऑगस्ट २०१४ रोजीच्या ठरावाचा परिच्छेद तीन (१०) पहा.

राज्य शासनाने स्वीकारलेले कमालीच्या आकसाचे धोरण मा. उच्च न्यायालयातील अनेक निर्णयांनी निष्प्रभावी ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठाच्या निर्णयांची अंमलबजावणी करणारे शासननिर्णय अजूनही काढण्यात आलेले नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** उच्च न्यायालयाच्या इतक्या खंडपीठांनी निर्णय दिल्यानंतर राज्यशासनाने खरे म्हणजे त्या निर्णयाची अंमलबजावणी करावयास पाहिजे होती पण तशी ती केली नाही. म्हणून अवमान याचिका दाखल झाल्या. **उच्च शिक्षण सचिवांना उच्च न्यायालयात क्षमा मागावी लागली.** पण राज्य शासनाने वैरभाव सोडला नाही. मा. उच्च न्यायालयातच पुनर्विचार याचिका (Review Petition) दाखल केली. "CIVIL APPLICATION (CAO) NO.1021/2013 IN M.C.A. ST. NO.11599/2013 (FOR REVIEW) IN WRIT PETITION NO.853/2012 (D)" या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ती याचिका फेटाळून लावली. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition) दाखल करण्याची मुदत निघून गेली होती पण आकसबुद्धी एवढी जोरदार की राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्येसुद्धा याबाबतीत विशेष परवानगी मागणारा अर्ज दाखल करण्याची मुदत निघून गेली असली तरी अपिलासाठी विशेष परवानगी मागणारी याचिका दाखल केली. ती याचिका दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी आली व ती विलंबाने आल्याच्या कारणावरून मा. सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केली. ती पुढील शब्दात "The special leave petition is **DISMISSED** on the ground of delay." सर्वोच्च न्यायालयात अर्ज डिसमिस झाल्यावर सुद्धा याबाबतचा धोरणात्मक शासननिर्णय अजूनही निर्गमित झालेला नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.** (९) समाजकार्य महाविद्यालयातील "**शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय**" मंत्रिमंडळाने ८ जुलै १९९८ च्या बैठकीत घेतला होता. राज्यशासनाचा हा निर्णय घटनेच्या कलम १४ चा भंग करणारा आहे म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाने १८ जानेवारी २००० रोजी रद्द (SET ASIDE) ठरविला होता, तर राज्य मंत्रिमंडळाने पून्हा ११ जुलै २००१ रोजीच्या बैठकीत "**या शिक्षकांना पेन्शन योजना लागू न करण्याचा निर्णय घेतला**" हे एक अत्यंत लांछनास्पद असे घटनाबाह्य वर्तन होते. मा. उच्च न्यायालयाने आता पुन्हा दिनांक १० जून २०१३ रोजी दिलेल्या निर्णयात "In democratic set up, no State can refuse to remove such discrimination. Since the injustice of hostile discrimination continues even today and judgments holding the field have not been implemented in letter and spirit" असे निरीक्षण नोंदविले व पुढील प्रमाणे आदेश दिले. :- "The monthly pension due to them from 1.1.2014 shall be released regularly along with others. Any default or delay in payment after stipulated period shall attract interest as per prevailing policy of the State Government." शासनाने लगेच सर्वोच्च न्यायालयात विशेष अपिलाची परवानगी मागण्यासाठी याचिका दाखल केली. मा. सर्वोच्च न्यायालयाने ती याचिका दिनांक १० जानेवारी २०१४ रोजी '**डिसमिस**' केली. आता मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे १ जानेवारी २०१४ पासून निवृत्तीवेतन या शिक्षकांना मिळायला लागले असेल असेच कुणालाही वाटेल पण याबाबतचा शासननिर्णय अजूनही निर्गमित झालेला नाही. **राज्य शासनाचे हे वर्तन सरळसरळ घटनाबाह्य आहे.**

**(१०) कुंठित वेतनवाढीच्या संदर्भात 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या जो 'गृहउद्योग' उच्चशिक्षण विभागात गेले ३-४ वर्षे राबविल्या जात आहे तो लक्षात घेता उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी आहेत किंवा त्यांचे उच्च शिक्षण विभागावरील नियंत्रण पूर्णपणे सुटले आहे असेच म्हणावे लागेल अशी स्थिती आहे.** महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २५ जानेवारी १९९९ रोजी याबाबतचा शासन निर्णय काढला, त्याला धरून उच्च शिक्षण विभागाने दिनांक १४ सप्टेंबर १९९९ रोजी शासननिर्णय काढला, त्याला धरून उच्च शिक्षण संचालक पूणे यांनी दिनांक १५ नोव्हेंबर २००३ रोजी बऱ्याच उशिराने एक परिपत्रक काढले. **सर्वांनी मिळून "विद्यापीठीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कुंठीत वेतनवाढी अदा करा" असे आदेशित केले.** त्याप्रमाणे कुंठीत वेतनवाढी अदा करण्यात आल्या, नंतर ८-१० वर्षांनी एकाएकी भुताटकी अंगात संचारल्याप्रमाणे रिकव्हऱ्यांचा जबरदस्त उपक्रम हाती घेण्यात आला. सन २०११, २०१२, २०१३ व २०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांचे एका मागून एक ६ निर्णय आलेत, पण ही भुताटकी थांबायचे नाव घेईना. दिनांक २२ ऑगस्ट २०११ रोजी मा. औरंगाबाद खंडपीठाचा **पहिला निर्णय** झाला, १ फेब्रुवारी २०१२ रोजी **दुसरा निर्णय** झाला, सर्वोच्च न्यायालयाने ९ मे २०१२ रोजी **राज्यशासनाची याबाबतची विशेष अनुमती याचिका 'डिसमिस' केली,** त्यानंतर ४ जुलै २०१२ रोजी मा. औरंगाबाद खंडपीठामध्ये **तिसरा निर्णय** झाला, त्यानंतर २९ जानेवारी २०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर **चौथा निर्णय** झाला, त्यानंतर १ ऑक्टोंबर २०१३ रोजी औरंगाबाद खंडपीठासमोर **पाचवा निर्णय** झाला, १ ऑक्टोंबर २०१३ रोजीच्या आदेशात मा. औरंगाबाद खंडपीठाने "It would be appropriate that the respondents follow these directions in the cases of the similarly situated persons, in order to avoid further petitions to the court." असे आदेशित केले. पण हे रिकव्हरीचे भूत उतरायलाच तयार नाही. हे सारे शिक्षक सेवानिवृत्त शिक्षक आहेत. विशेष गमतीची गोष्ट अशी की, मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठ क्षेत्रातील ५२ शिक्षकांच्या बाजूने मा. उच्च न्यायालयाचा उपरोक्त चौथा निर्णय २१ जानेवारी २०१३ रोजी लागला, त्यानंतर याचिकाकर्त्यांना अवमान याचिका दाखल करावी लागली. आता अधिकारी घरोघरी परतावा नेऊन देत आहेत. दुसऱ्या बाजूला त्याचवेळी याच विभागातील इतर २० सेवानिवृत्त शिक्षकांना या रिकव्हरीच्या भुताटकीपासून मा. नागपूर खंडपीठापुढे स्वतःचा बचाव करण्यासाठी जावे लागले. दिनांक ४ ऑगस्ट २०१४ रोजी त्यांच्या बाजूने निकाल लागला. हा **सहावा निर्णय** होय. आता त्यांना अवमान याचिका दाखल करावी लागेल. तर तिसऱ्या बाजूला त्याच भागात ही भुताटकी ज्याच्या मानगुटीवरुन उतरायला तयार नाही अशा काही शिक्षकांना मा. नागपूर खंडपीठापुढे सन २०१४ मध्ये सन २०१४ ची याचिका क्रमांक २२१५ दाखल करावी लागली आहे. सारांश काय तर नागपूर खंडपीठापुढे रिकव्हरीग्रस्तांच्या एका यचिकेचा सन २०१३ मध्ये निकाल लागला. याचिकाकर्त्यांनी अवमान याचिका दाखल केल्यावर ते सारे सेवानिवृत्त असल्याने आता घरोघरी परतावा नेऊन देण्यात आला आहे. त्याचवेळी इतरत्र रिकव्हरी सुरूच आहे. अशा अनेक रिकव्हरीग्रस्तांच्या बाबतीत याच खंडपीठासमोर दुसऱ्या याचिकेत याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय सन २०१४ मध्ये झाला. आता त्यांनासुद्धा अवमान याचिका दाखल कराव्या लागतील. तेसुद्धा सारेच सेवानिवृत्त शिक्षकच असल्यामुळे घरोघरी परतावा नेऊन द्यावा लागेल. मात्र इतरत्र तत्सम प्रकरणी रिकव्हऱ्या चालूच आहेत. त्यामुळे मा. नागपूर खंडपीठासमोर सन २०१४ ची याचिका क्रमांक २२१५ दाखल झालेली आहे व सुनावणीत आहे. हा कसा काय राज्य कारभार चालला आहे? हे कळायला मार्ग नाही. **पुन्हा पुन्हा कोर्ट कचेरी करावी लागू नये म्हणून आमच्या आदेशाचे पालन करण्यासाठी धोरणात्मक शासननिर्णय काढा असा मा. उच्च न्यायालयाने १ ऑक्टोंबर २०१३ रोजी निर्णय दिल्यानंतर सुद्धा हे शासन काहीच करीत नाही. उलट रिकव्हऱ्यांची भुताटकी सुरूच राहते याचा अर्थ उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी आहेत किंवा त्यांचे उच्च शिक्षण विभागावरील नियंत्रण पूर्णपणे सुटले आहे यापेक्षा वेगळा निष्कर्ष या घटनाक्रमातून निघत नाही.**

**चार** : मुख्यमंत्री, उच्चशिक्षण मंत्री यांनी वारंवार दिलेली लेखी अभिवचने पाळली जात नाहीत ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. मा. उच्च न्यायालयाच्या ३० ते ४० न्यायनिर्णयांची तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांची अंमलबजावणी केली जात नाही ही अत्यंत अशोभनीय बाब आहे. राज्यशासनाच्या **राज्यकारभार करण्याच्या उपरोक्त पद्धतीचा तीव्र निषेध म्हणून आचार संहितेचा अंमल संपल्यानंतर १ जून २०१४ च्या ठरावान्वये सुरू केलेले व आचारसंहितेच्या काळात तहकूब ठेवण्यात आलेले आंदोलन पुन्हा सुरू करण्यात येईल.** इतकेच नव्हे तर हे आंदोलन तीव्र करण्यासाठी पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

(१) सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०१४ रोजी दुपारी १२ ते ४ वेळेत विद्यापीठस्तरीय संघटनामार्फत **मा. कुलगुरू कार्यालयासमोर धरणे आंदोलन** आयोजित करण्यात येईल.

(२) सोमवार दिनांक १ डिसेंबर २०१४ रोजी दुपारी १२ ते ४ वेळेत आझाद मैदान मुंबई येथे **राज्यस्तरीय धरणे आंदोलन** केले जाईल.

(३) सोमवार दिनांक ८ डिसेंबर २०१४ रोजी राज्यभर **सामूहिक रजा** कार्यक्रम आयोजित केला जाईल.

(४) सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०१४ पासून '**बेमुदत कामबंद आंदोलन**' करण्याचे ठरविण्यात आले.

**(प्रा. ए. टी. सानप)** *अध्यक्ष*

**(डॉ. प्रवीण रघुवंशी)** *सहसचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

# अवमान याचिका दाखल झाल्यामुळे "रिकव्हऱ्यांचा परतावा" घरोघरी नेऊन देत असतांना तत्सम प्रकरणी "रिकव्हऱ्या काढण्याचा धंदा" अधिकाऱ्यांनी सुरुच ठेवला आहे

## उच्च शिक्षण विभागातील हा वेडाचार कधीतरी थांबला पाहिजे

**प्रा. बी. टी. देशमुख**
महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष

पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी संपून कितीतरी महिने झालेले आहेत. दिनांक १ जानेवारी २००६ पासून सहाव्या वेतन आयोगाचा अंमल सुरू झाला. या घटनेला आता ८ वर्षाच्या वर काळ लोटलेला आहे. पण तरीही पाचव्या वेतन आयोगातील काही तरतुदींना खाजवून प्राध्यापकांना खरडण्याच्या, त्यांच्या रिकव्हऱ्या काढण्याच्या किलोत्पाटी कारवाया उच्च शिक्षण विभागातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी सुरुच ठेवल्या आहेत. "कुंठित वेतनवाढीच्या संदर्भात 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या जो 'गृहउद्योग' उच्चशिक्षण विभागात गेले ३-४ वर्षे राबविल्या जात आहे तो लक्षात घेता उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी आहेत किंवा त्यांचे उच्च शिक्षण विभागावरील नियंत्रण पूर्णपणे सुटले आहे असेच म्हणावे लागेल अशी स्थिती आहे." असे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने मंजूर केलेल्या ठरावात नमूद करण्यात आलेले आहे. याचे गांभीर्य सर्वांनीच समजून घेणे आवश्यक आहे. संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या खंडपीठांनी दिलेल्या सहा निर्णयांच्या आधारे हे गांभीर्य लक्षात आणून देण्याचा पुढील परिच्छेदातून प्रयत्न केलेला आहे.

२. पाचव्या वेतन आयोगाच्या व्यवस्थेमध्ये कुंठित वेतनवाढीची काय उपव्यवस्था समाविष्ट होती व तिचे स्वरूप काय होते हे लक्षात घेण्यासारखे आहे. पाचव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेणीच्या अंमलबजावणीमध्ये अनुदानित महाविद्यालयातील ज्या प्राध्यापकांची वेतननिश्चिती १२०००-४२०-१८३०० मध्ये झालेली असेल व जे रु. १८,३००/- ह्या कमाल वेतनावर कुंठित (Stagnant) झाले असतील अशांना १८,३०० वर कुंठित झालेल्या दिनांकापासून दोन वर्षांनी एक वेतनवाढ प्राप्त होऊ शकेल. अशा कमाल तीन वेतनवाढी मिळण्याचे प्रावधान उपरोक्त कुंठित वेतन वाढीच्या व्यवस्थेमध्ये होते. उदा. १.१.२००० ला १२०००-१८३०० च्या वेतनश्रेणीत जो प्राध्यापक रु. १८३०० ह्या कमाल वेतनावर कुंठित झालेला असेल त्याला दोन वर्षांनी म्हणजे १.१.२००२ ह्या दिनांकाला एक वेतनवाढ मिळू शकेल व ही वेतनवाढ वेतनश्रेणीमध्ये घेतलेल्या शेवटच्या वेतनवाढीच्या दराच्या समतुल्य असेल. पाचव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक २२ जुलै १९९८ रोजी याबाबतचा शासन निर्णय केन्द्रीय कर्मचाऱ्यांसाठी निर्गमित केला. जे केंद्र शासकीय कर्मचारी रुपये २२,४०० पेक्षा अधिक कमाल वेतन

(1)

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD**
**WRIT PETITION NO. 9054 OF 2010**

Association of College and University Superannuated Teachers (Maharashtra) *PETITIONER* ***VERSUS*** The State of Maharashtra through its Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai and ors. *RESPONDENTS*

**AND WRIT PETITION NO. 2868 OF 2011**

Association of College and University Superannuated Teachers (Maharashtra) *PETITIONER* ***VERSUS*** The State of Maharashtra through its Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai and ors. *RESPONDENTS*

Mr. S.V. Adwant, Advocate **for the Petitioner.** Mr. K.S. Patil, A.G.P. **for the Respondent** State. Mr. Alok Sharma, Assistant Solicitor General **for the respondent no. 3 UGC.**

## CORAM : B.R. GAVAI AND M.T. JOSHI, JJ.

**DATED : 22ND AUGUST, 2011 : ORAL ORDER**

**(1)** Rule. Rule made returnable forthwith. Heard by consent.

**(2)** By way of the present Petitions, the petitioners impugn the communication addressed by the respondent Government dated 10.3.2008 and 18.3.2010, thereby seeking to recover the amount of stagnation increment from the pension account of the members of the petitioner association, whose names are given in the Exhibit "F".

**(3)** The members of the petitioner association were employees of colleges and universities. The respondent State had given the benefits on account of stagnation of the services to the members of the petitioner association vide Government resolution dated 25.1.1999. However, it appears that subsequently, it was realised by the State Government that the members of the petitioner association were not entitled to stagnation allowance and as such the impugned communications were issued, thereby seeking to recover the amount from the pension account of the members of petitionerassociation.

**(4)** By now, it is a settled position of law that recovery from the salary/pension of an employee cannot be made, if the amount in excess was paid to such an employee for the reasons not attributed to such an employee. It is not the case of the respondents that the stagnation amount was paid to the members of the petitioner association on account of any misrepresentation made by such members.

**(5)** In that view of the matter, in view of the law laid down by the Apex Court in *Syed Abdul Qadir and ors. Vs. State of Bihar and ors. 2009* reported in *(2009) 3 Supreme Court Cases 475,* both the Petitions deserve to be allowed.

**(6)** The impugned communication dated 10.3.2008 and 18.3.2010 are therefore quashed and set aside. It is held that the respondents are not entitled to recover the amount from the pension of the petitioners. Insofar as the amount which is already recovered from the pension of the members of the petitioner association, it is directed that such amount shall be returned to the employees from whom it is deducted within a period of three (3) months from today alongwith the interest at the rate of 12% per annum.

**(7)** Rule is made absolute in the aforesaid terms, however, with no order as to costs.

**M. T. JOSHI, J.]** **[B. R. GAVAI, J.]**

नसलेल्या त्यांच्या पदांच्या सुधारित वेतनश्रेणीत कुंठित झाले असतील त्यांना कुंठित वेतनवाढी वर प्रमाणे मंजूर करण्यात आल्या होत्या.

**३.** केंद्र शासनाचा उपरोक्त २२ जुलै १९९८ रोजीचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २५ जानेवारी १९९९ रोजी याबाबतचा "**सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठित झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना कुंठित वेतनवाढी मंजूर करणेबावत**" या मथळ्याचा एक शासन निर्णय (क्रमांक : १०९९/प्र.क्र.१/९१ सेवा-३) निर्गमित केला. या शासननिर्णयाच्या परिच्छेद दोन मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद करण्यात आली होती.:- "(२) राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अशा कुंठित वेतनवाढीचा लाभ देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन असे आदेश देत आहे की, जे राज्य शासकीय कर्मचारी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम १९९८ खाली सुधारित वेतनश्रेणीची निवड करतील आणि त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर पोहोचतील त्यांना त्यांच्या वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर दर दोन वर्षे पूर्ण झाल्यावर एक कुंठित वेतनवाढ मंजूर करावी. ही वेतनवाढ वेतनश्रेणीमध्ये घेतलेल्या शेवटच्या वेतनवाढीच्या दराच्या समतुल्य असेल अशा कमाल तीन वेतनवाढी देण्यात येतील."

**४.** वित्त विभागाने याबाबतचा शासननिर्णय निर्गमित केल्यानंतर सात-आठ महिन्याच्या विलंबाने का होईना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने "**सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठित झालेल्या कर्मचाऱ्यांना कुंठित वेतनवाढी मंजूर करणेबाबत, विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचारी.**" या मथळ्याचा एक शासन निर्णय (एनजीसी १३९५/६१२८५/(३१६७) विशि-४) दिनांक १४ सप्टेंबर १९९९ रोजी निर्गमित केला. त्या शासन निर्णयामध्ये पुढीलप्रमाणे तरतूद समाविष्ट आहे.:- "(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेतन १०९९/प्र.क्र.१/९९/सेवा-३ दिनांक २५.१.१९९९ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू केलेले आदेश या आदेशान्वये विद्यापीठे व संलग्नित महाविद्यलयांतील कर्मचाऱ्यांना जसेच्या तसे लागू करण्यात येत आहेत."

**५.** राज्य शासनाच्या वित्त विभागाचा व उच्चशिक्षण विभागाचा शासननिर्णय निर्गमित झाल्यानंतर त्या दोनही निर्णयाचा संदर्भ देऊन राज्याच्या उच्चशिक्षण संचालकांनी "**विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापकांना कुंठित वेतनवाढी मंजूर करण्यासंबंधी मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देश**" या मथळ्याचे एक परिपत्रक बऱ्याच उशिराने (क्र. शिसं/उशि/म.रा./कुंठित वेतन/०३/१३००) दिनांक १५ नोव्हेंबर २००३ रोजी निर्गमित केले. त्या परिपत्रकानुसार सर्व विभागीय सहसंचालकांना पुढीलप्रमाणे आदेशित करण्यात आले होते.:- "संदर्भांकित शासन निर्णयानुसार **आपल्या आधिपत्याखालील अशासकीय महाविद्यालयातील व विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीमुळे कुंठित झालेल्या वेतनवाढी देण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना व विद्यापीठांना योग्य ते आदेश तात्काळ कळविण्यात यावेत** व केलेल्या कार्यवाहीचा तपशील संचालनालयास पाठविण्यात यावा."

**६.** एकदा उच्चशिक्षण संचालकांनी उपरोक्तप्रमाणे आदेश निर्गमित केल्यानंतर सर्व सहसंचालकांनी त्याबाबतची पुढील कारवाई सुरू केली व पूर्ण केली. उदाहरण म्हणून द्यायचे झाल्यास नागपूरच्या सहसंचालक उच्चशिक्षण यांच्या कार्यालयाने नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव व सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना एक पत्र (क्रमांक उशि/नाग/२/५९८६/२००३) दिनांक २८ नोव्हेंबर २००३ रोजी पाठविले. त्यात पुढीलप्रमाणे कळविण्यात आले होते. "मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार या कार्यालयास कळविल्याप्रमाणे शासन निर्णय दिनांक २५.१.९९ अन्वये ज्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीची कमालमर्यादा रुपये २२४००/- पेक्षा अधिक नसेल आणि जे सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यावर दर दोन वर्षे पूर्ण झाल्यावर एक कुंठित वेतनवाढ मंजूर करावी ही वेतनवाढ वेतनश्रेणीमध्ये घेतलेल्या शेवटच्या वेतनवाढीच्या दराच्या समतुल्य असेल. अशा कमाल ३ वेतनवाढी देण्यात येतील." शेवटी आपल्या पत्रात सहसंचालकांनी असेही नमूद केले होते की :- "**तरी आपल्या महाविद्यालयातील व विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुधारित वेतनश्रेणीच्या कमाल वेतनावर कुंठित झालेल्या कर्मचाऱ्यांना कुंठित वेतनवाढी दिलेल्या नाहीत अशा कर्मचाऱ्यांना कुंठित झालेल्या वेतनवाढी देण्याबाबतची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.**"

**७.** नुटाचे तत्कालीन सचिव डॉ. एकनाथ कठाळे यांच्या नेतृत्वाखाली

(2)

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD**
**WRIT PETITION NO. 9304 OF 2011**

Association of College and University Superannuated Teachers Vs. The State of Maharashtra and others.
Mr. S.V. Adwant, Advocate for petitioner.
Mr. K.G. Patil, AGP for respondent No. 1.

**CORAM**
**B.R. GAVAI & SUNIL P. DESHMUKH, JJ.**
DATE :- 1st FEBRYARY , 2012.
PER COURT :-

(1) Leave to delete respondent No.3.

(2) Rule. Rule made returnable forthwith.

(3) Facts in the present case are identical with the facts in W.P. No. 9054 of 2010 and 2868 of 2011. By a reasoned order, we had allowed those petitions vide order dated 22nd August, 2011.

(4) Rule is, therefore, made absolute in terms of the following order :-

" The impugned communications dated 10.3.2008 and 18.3.2010 are therefore quashed and set aside. It is held that the respondents are not entitled to recover the amount from the pension of the petitioners. In so far as the amount which is already recovered from the pension of the members of the petitioner-association is concerned, it is directed that such amount shall be returned to the employees from whom it is deducted, within a period of three (3) months from today alongwith the interest at the rate of 12% per annum."

**[SUNIL .P. DESHMUKH,J.]** **[B.R. GAVAI, J.]**

ITEM NO.9 COURT NO.8 SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

RECORD OF PROCEEDINGS

Petition(s) for Special Leave to Appeal (Civil) CC 8399-8400/2012

(From the judgement and order dated 22/08/2011 in WP No.9054/2010,WP No.2868/2011 of The HIGH COURT OF BOMBAY AT AURANGABAD)

STATE OF MAHARASHTRA AND ORS **Petitioner(s)**
**VERSUS** ASSN.OF COLEGE & UNIVERSITY SUP.TEACHERS ...**Respondent(s)**

(With appln(s) for c/delay in filing SLP and office report)

Date: 09/05/2012

These Petitions were called on for hearing today.

**CORAM**
HON'BLE MR. JUSTICE H.L. DATTU
HON'BLE MR. JUSTICE CHANDRAMAULI KR.PRASAD

**For Petitioner(s)** Ms. Aparajita Singh, Adv.Ms. Asha Gopalan Nair,Adv.**For Respondent(s)** Mr. Chinmoy Khaladkar, Adv. Mr. Amol N. Suryawanshi, Adv.
UPON hearing counsel the Court made the following

**O R D E R**
**DELAY CONDONED. DISMISSED.**

(NAVEEN KUMAR) COURT MASTER (SHARDA KAPOOR)

दिनांक १८ नोव्हेंबर २००३ रोजी नुटाच्या शिष्टमंडळाने सहसंचालक उच्चशिक्षण नागपूर विभाग नागपूर यांची त्यांच्या कार्यालयामध्ये भेट घेतली. दुपारी ४ वाजता झालेल्या या बैठकीमध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या विविध अनिर्णयीत प्रश्नांवर चर्चा झाली. त्या बैठकीचे अधिकृत कार्यवृत्त सहसंचालक उच्चशिक्षण नागपूर विभाग नागपूर यांच्या स्वाक्षरीने दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी डॉ. एकनाथ कठाळे यांच्याकडे पाठविण्यात आले. त्या कार्यवृत्तामध्ये कुंठित वेतनवाढीबाबत पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.:- "**(२) कुंठित वेतनवाढीच्या संदर्भातील तक्रारी** : शासन निर्णय दि. ६.११.१९९६ व शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी १९९९ व शासन निर्णय दिनांक ३ मार्च २००० अंतर्गत **कुंठित वेतनवाढीची प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.** या कार्यालयाचे पत्र क्र. उशिनाग/२/५९८५/२००३, दिनांक २८.११.२००३ अन्वये सर्व महाविद्यालयांना सूचना निर्गमित केलेल्या आहेत."

८. अशा रीतीने कुंठित वेतनवाढीचे सर्व लाभ २००३ च्या शेवटी महाराष्ट्रातील सर्व विभागातील पात्र लाभधारकांना प्राप्त झाले होते. कोणालाही काही मिळण्याचे शिल्लक राहीले नव्हते. सन २००९ च्या ऑगस्ट महिन्यात सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या अंमलात आणण्याचा शासननिर्णय निर्गमित झाला व काही अधिकाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले. सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी बाजूला राहिली व पडताळणीचे नवे थोतांड त्यांनी समोर उभे केले. **त्यात कुंठित वेतनवाढी या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना लागूच नव्हत्या अशी भुताटकी त्यांनी उभी केली.**

९. दरम्यानच्या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाने ऑक्टोंबर २००६ मध्ये एक परिपत्रक (No. F-2-11/2001/PS) पाठवून स्पष्टपणे पुढीलप्रमाणे कळविले होते.:- "I am directed to say that the general instruction of stagnation increment provided under Government of India 17 under Rule 26 of FR/SR should be made applicable to all and where the maximum of pay scale does not exceed

(3)

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD**

**WRIT PETITION NO. 7838 OF 2011**

Association of College and University Superannuated Teachers (Maharashtra) A society registered at No. A853/2009 Under the provisions of the Societies Registration Act, having its Heard Office at 20,Sawarkarnagar N5 (South) Cidco, Aurangabad Through its President and Convenor, Principal Dr.M.A.Wahul **...PETITIONER.**

**VERSUS**

The State of Maharashtra Through its Secretary, Higher and Technical Education Department, Mantralaya, Mumbai and others. **...RESPONDENTS.**

Shri S.V.Advant,Advocate for Petitioner. Shri K.B.Choudhari, AGP for Resp. Nos. 1 & 2 Shri Alok Sharma,ASG for respondent No.5.

**CORAM**

**B.P. DHARMADHIKARI AND SUNIL P. DESHMUKH, JJ.**

**DATE : 04.07.2012**

P.C:- Rule, Rule made returnable forthwith. Heard learned counsel for the parties.

2. Advocate for the petitioner points out controversy is concluded in favour of the petitioners, by order dated 22.08.2011, delivered in Writ Petition No. 9054 of 2010 and 2868 of 2011 and that judgment was questioned by the State Government before the Hon'ble Apex Court in SLP(Civil) 8399-8400/ 2012. The Hon'ble Apex Court has on 09.05.2012 dismissed the SLP. He, therefore, submits that petitioners are entitled to refund in accordance with the directions contained in para No. 6 of that order.

3. The learned AGP is opposing the same, however, he is not in position to point out any factual error or mistake in the position disclosed by the Advocate Mr. Advant. **Learned ASG states that though stagnation increment is not condition of service controversy appears to have been covered by the orders of this Court.**

4. **The question whether stagnation increment is condition or not condition of service is not relevant for adjudication of present controversy.** The petitioners have been extended that benefit and after their retirement, its recovery was sought. Identical recovery was questioned in above mentioned two Writ Petitions and this Court has quashed the same, by order dated 22.08.2011.

5. The controversy involved in present Writ Petition is covered by said adjudication. Accordingly directions as contained in para no. 6 of the earlier order dated 22.08.2011 needs to be issued here also.

6. Thus, we hold that respondents are not entitled to recover the amount from pension of the petitioners. Amount already recovered shall be refunded to the concerned employees within a period from three months from today with interest @ 12% p.a.. Rule is made absolute in above terms. No order as to costs.

**[SUNIL P.DESHMUKH,J.] [B.P.DHARMADHIKARI,J.]**

(4)

**२६.** मा. खंडपीठाच्या निर्णयाप्रमाणे धोरणात्मक शासननिर्णय काही राज्य शासनाने काढला नाही. रिकव्हऱ्यांचा उद्योग अखंडपणे चालूच राहीला, त्यानंतरची कोर्टकचेरी पुन्हा नागपूर खंडपीठासमोर झाली. अमरावती विभागातील निरनिराळ्या २० शिक्षकांना याचिका दाखल कराव्या लागल्या. सन २०१३ ची ही याचिका क्रमांक ६४७२ सुनावणीला आली व दिनांक ४ ऑगस्ट २०१४ रोजी मा. नागपूर खंडपीठाने याबाबतीत सहावा निर्णय दिला. हा याबाबतचा **सहावा निर्णय** होय. (या संदर्भात उपलब्ध असलेला मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा हा सहावा निर्णय याच बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक १६२ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.) या निर्णयामध्ये याचिकाकर्त्यांचे म्हणणे पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले आहे.:- "The learned counsel for the petitioners states that the issue involved in this petition stands covered by the judgment of the Hon ble Supreme Court in the case of Syed Abdul Qadir and others v. State of Bihar and ors., reported in (2009) 3 SCC 475, and the judgment of the Aurangabad Bench of the Bombay High Court dated 22.8.2011 rendered in Writ Petitions No.6054 of 2010 and 2868 of 2011. It is submitted that in view of the law laid down by the Hon ble Supreme Court and this Court in the aforesaid two judgments, the State Government was not entitled to recover the amount wrongly paid to the petitioners while in service, from their pension." शासनाचे म्हणणे याच निर्णयात पुढील शब्दात नोंदविले आहे. "The learned Assistant Government Pleader does not dispute that the case stands covered by the law laid down by the Hon'ble Supreme Court and followed by this Court, in the aforesaid two judgments." शेवटी मा. खंडपीठाने आपला आदेश पुढीलप्रमाणे शब्दबद्ध केलेला आहे.:- "In view of the aforesaid, the writ petition is allowed. The respondents are directed to refund the amount that was recovered from the pension of the petitioners within a period of four months." इतक्या उपरही तत्सम प्रकरणी रिकव्हऱ्या चालुच होत्या त्यामुळे मा. नागपूर खंडपीठासमोर आणखी एक म्हणजे सन २०१४ ची याचिका क्रमांक २२१५ दाखल झालेली आहे

**२७.** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागामध्ये चालू असलेला हा वेडाचार उपरोक्त परिच्छेदांमधून तपशीलवारपणे मांडला आहे. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दिनांक २४ ऑगष्ट २०१४ रोजीच्या बैठकीच्या ठरावातील "कुंठित वेतनवाढीच्या संदर्भात 'रिकव्हऱ्या' काढण्याच्या जो 'गृहउद्योग' उच्चशिक्षण विभागात गेले ३-४ वर्षे राबविल्या जात आहे तो लक्षात घेता उच्च शिक्षणमंत्री श्री. राजेश टोपे हे या भ्रष्ट कारभारामध्ये सहभागी अथवा समभागी आहेत किंवा त्यांचे उच्च शिक्षण विभागावरील नियंत्रण पूर्णपणे सुटले आहे असेच म्हणावे लागेल." हा भाग लक्षात येण्यासाठी उपरोक्त मजकूर पुरेसा आहे.

*****

# उच्चशिक्षण सचिवांना सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त माफी मागावी लागली

- **डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष 'नुटा'

**ग्रॅच्युईटीच्या संदर्भातील भेदभाव ३ महिन्यात संपुष्टात आणा असा आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०१३ रोजी दिलेला असतांना पुढच्या अठरा महिन्याच्या काळात ती कारवाई पूर्ण झाली नाही. शेवटी आता ४ जुलै २०१४ रोजी महाराष्ट्राच्या उच्चशिक्षण सचिवांना मा. सर्वोच्च न्यायालयात बिनशर्त क्षमायाचना करावी लागली.** याबाबतची तपशीलवार माहिती पुढील परिच्छेदातून दिलेली आहे. १ जानेवारी २००६ नंतर पण २१ ऑगस्ट २००९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना सेवानिवृत्ती समयी अदा करावयाच्या ग्रॅच्युईटी संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० जानेवारी २०१३ रोजी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने ग्रॅच्युईटी अदा करण्याबाबत २१ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाने ठरवून दिलेली १ सप्टेंबर २००९ ही "कट ऑफ डेट" पुढील शब्दात रद्दबादल ठरविलेली होती. "In the result, the appeal is allowed and the impugned order is set aside. The cut-off date, i.e. 01.09.2009 specified in G.R.dated 21.08.2009 is declared unconstitutional and it is held that the employees governed by Government Resolution dated 5.5.2009 are entitled to the benefit of enhanced gratuity, i.e. Rs.7 lacs." याच निर्णयात पुढे असेही नमूद करण्यात आलेले होते की, "As a sequel to the above, we direct that **within three months** from the date of receipt/production of copy of this order, State Government shall pay to the members of the **appellant and other similarly situated employees** difference of the gratuity already paid and enhanced gratuity payable in terms of G.R. dated 21.08.2009. The parties are left to bear their own costs."

**२.** मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील आदेशाचा जो भाग वर शब्दशः नमूद केला आहे, त्याचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास तीन प्रमुख बाबी ठसठसशीतपणे समोर येतात.

(अ) या सर्व **याचिकाकर्त्यांना** प्रत्यक्ष देण्यात आलेली ग्रॅच्युईटी व २१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयाप्रमाणे देणे असलेली वाढीव ग्रॅच्युईटी यातील फरक (प्रत्येकी २ लक्ष रुपये) शासनाने अदा करावा.

**(ब)** तोच अन्याय दूर करण्यासाठी एकेका व्यक्तीवर कोर्टकचेरी करण्याची पाळी येऊ नये म्हणून याचिकाकर्त्यांच्या बरोबरच **तत्सम सर्व कर्मचाऱ्यांना** "**appellant and other similarly situated employees**" शासनाने हा फरक (प्रत्येकी २ लक्ष रुपये) अदा करावा असेही मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

**(क)** उपरोक्त दोनही बाबींची पूर्तता करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात तीन महिन्यांची कालमर्यादा ("**within three months**") महाराष्ट्र शासनाला ठरवून दिली होती.

**३.** मा. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय ३० जानेवारी २०१३ रोजीचा आहे. म्हणजे या घटनेला आता जवळजवळ १८ महिन्यांचा काळ उलटून गेलेला आहे. पण उपरोक्त दोन आदेशांपैकी एकाही आदेशाचे परिपालन राज्यशासनाने केले नाही. विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवानिवृत्त शिक्षकांच्या संघटनेने "*Association of College & University Superannuated Teachers*" याबाबतीत मूळ याचिका दाखल केली होती. त्या संघटनेवर पुन्हा अवमान याचिका दाखल करण्याची वेळ आली. मा. सर्वोच्च न्यायालयाने तीन महिन्यात पूर्ण करण्यासाठी दिलेल्या आदेशाची १५ महिने पूर्ण झाले तरी अंमलबजावणी करण्यात आलेली नव्हती. अशा स्थितीत ९ मे २०१४ रोजी जेव्हा "ASSO.OF COLLEGE & UNIV.SUP.TEACHERS Petitioner(s) ***VERSUS*** SANJAYKUMAR, SECR. HR. & TECH. ED. DEP.& ANR Respondent(s)" या प्रकरणातील "CONTEMPT PETITION (C) NO. 277 OF 2014 IN CONMT.PET.(C) NO.307/2013" ही अवमान याचिका मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आली, तेव्हा शासनातर्फे न्यायालयात कुणीही उपस्थित नव्हते. मा. सर्वोच्च न्यायालयाने त्या दिवशी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले:- "Issue notice to respondent no.1, returnable in the first week of July, 2014." (मा. सर्वोच्च न्यायालयातील दिनांक ९ मे २०१४ रोजीच्या या घडामोडीचे अधिकृत प्रतिवेदन याच बुलेटीनच्या पृष्ठ १६४ वर प्रसृत केलेले आहे.)

**४.** या अवमान याचिकेमध्ये उच्चशिक्षण विभागाचे सचिव श्री. संजयकुमार हे व्यक्तिशः नावानिशी अवमानकर्ते म्हणून प्रतिवादी होते. दिनांक ४ जुलै २०१४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी याचिकेमध्ये न्यायालयाचा अवमानकर्ते असे ज्यांना संबोधिले होते त्यांनी वेळेच्या आत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची

**09/05/2014**

*ITEM NO.5 COURT NO.12 SECTION IX*

**SUPREME COURT OF INDIA**

(RECORD OF PROCEEDINGS)

CONTEMPT PETITION (C) NO. 277 OF 2014 IN CONMT.PET.(C) NO.307/2013

(FOR PREL.HEARING)ASSO.OF COLLEGE & UNIV.SUP.TEACHERS Petitioner(s) ***VERSUS*** SANJAYKUMAR, SECR. HR. & TECH. ED. DEP.& ANR Respondent(s)

**Date: 09/05/2014**

This Petition was called on for hearing today.

**: CORAM :**

HON'BLE MR. JUSTICE FAKKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA

HON'BLE MR. JUSTICE A.K. SIKRI

For Petitioner(s) Mr. Amol Nirmalkumar Suryawanshi,Adv. For Respondent(s) UPON hearing counsel the Court made the following

**O R D E R**

**Issue notice to respondent no.1, returnable in the first week of July, 2014.**

Dasti, in addition, is permitted.

(Narendra Prasad) Court Master (Sharda Kapoor)

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**आंदोलनाचा कार्यक्रम**

*(१) सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०१४ रोजी दुपारी १२ ते ४ वेळेत विद्यापीठस्तरीय संघटनामार्फत **मा. कुलगुरू कार्यालयासमोर धरणे आंदोलन** आयोजित करण्यात येईल.*

*(२) सोमवार दिनांक १ डिसेंबर २०१४ रोजी दुपारी १२ ते ४ वेळेत आझाद मैदान मुंबई येथे **राज्यस्तरीय धरणे आंदोलन** केले जाईल.*

*(३) सोमवार दिनांक ८ डिसेंबर २०१४ रोजी राज्यभर **सामूहिक रजा** कार्यक्रम आयोजित केला जाईल.*

*(४) सोमवार दिनांक १५ डिसेंबर २०१४ पासून **'बेमुदत कामबंद आंदोलन'** करण्याचे ठरविण्यात आले.*

**(प्रा. ए. टी. सानप)** — *अध्यक्ष*

**(डॉ. प्रवीण रघुवंशी)** — *सहसचिव*

पूर्तता न केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयासमोर बिनशर्त माफी मागितली. "tenders unconditional apology as the contemnors have not complied with the direction in making the payment within the due date." अवमानकर्त्या उच्चशिक्षण सचिवांनी न्यायालयासमोर असेही सांगितले की याचिकाकर्त्यांची थकबाकी किती होते? याची माहिती आम्ही मिळविली असून ती ३२ कोटी रुपये आहे. "the contemnors have worked out the aggregate payable to the members of the petitioner-Association which works out to Rs. 32 Crores" या सर्व घटनाक्रमांची मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या त्या दिवशीच्या आदेशात नोंद केली असून ती शब्दशः पुढीलप्रमाणे आहे.:- "Since counsel has put in appearance for the **alleged contemnors** and makes a specific statement that the contemnors have worked out the aggregate payable to the members of the petitioner-Association which works out to Rs. 32 Crores **tenders unconditional apology** as the contemnors have not complied with the direction in making the payment within the due date." (मा. सर्वोच्च न्यायालयातील दिनांक ४ जुलै २०१४ रोजीच्या या घडामोडीचे अधिकृत प्रतिवेदन याच बुलेटीनच्या पृष्ठ १६५ वर प्रसृत केलेले आहे.)

**५.** त्याच दिवशीच्या सूनावणीमध्ये अवमानकर्त्या शिक्षण सचिवांच्या अधिवक्त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयाला असे सांगितले की आता ही रक्कम निश्चित झालेली असल्यामुळे पुढील ४ आठवडयात निश्चितपणे अदा केली जाईल. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ जुलै २०१४ च्या आदेशातील याबाबतचा आवश्यक तो भाग पुढीलप्रमाणे.:- "Learned senior counsel for the contemnors also states that now that the amount payable has been ascertained, the same will definitely be paid within four weeks from today."

**६.** उच्च शिक्षण सचिवांनी बिनशर्त माफी मागितली, अदा करावयाच्या रक्कमेचे निर्धारण झाल्याचे सांगीतले, ती रक्कम आम्ही चार आठवडयात निश्चितपणे अदा करू असेही न्यायालयासमोर सांगितल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने ४ जुलै २०१४ रोजी अवमानयाचिका निकाली काढली होती व त्यानंतर 'बोर्डा' वर नसतांना 'मेन्शन' केल्यावरून दिनांक १६ जुलै २०१४ रोजी ही बाब पुन्हा सुनावणीला घेतली व "चार आठवड्यात थकीत रक्कम अदा करण्यात येईल" या ऐवजी "चार आठवडयात ती रक्कम मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या नोंदणी शाखेत जमा करण्यात येईल." असा बदल आपल्या आदेशात केला. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १६ जुलै २०१४ रोजी पारित केलेल्या आदेशातील तो मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणे.:- "On a mention made by the counsel for the parties, we direct that the statement recorded in para 2 of our order dated 04.07.2014 stands corrected to the effect that the amount ascertained will be deposited with the Registry of the Bombay High Court, Aurangabad Bench, within four weeks." (मा. सर्वोच्च न्यायालयातील दिनांक १६ जुलै २०१४ रोजीच्या या घडामोडीचे अधिकृत प्रतिवेदन याच बुलेटीनच्या पृष्ठ १६६ वर प्रसृत केलेले आहे.)

**७.** चिकाटीने पाठपुरावा करून हे यश "*Association of College & University Superannuated Teachers*" या संघटनेने मिळविले त्याबद्दल संघटना निःसंशय अभिनंदनास पात्र आहे. मा. सर्वोच्च न्यायालयातील या घटनाक्रमाचा काळजीपूर्वक व बारकाईने विचार केल्यास असे लक्षात येते की **तीन महिन्यात थकबाकी अदा करण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०१३ रोजी आदेशीत केलेले असतांना उच्च शिक्षणसचिवांना १८ महिन्याचा काळ उलटून गेला तरी त्या आदेशाचे पालन करता आले नाही.** ते एक वरिष्ठ आयएएस अधिकारी असल्यामुळे व सर्वोच्च न्यायालयात कबूल करुन एखादी गोष्ट न करण्याचे काय परिणाम होतात याची त्यांना जाणीव असल्यामुळे ते तेथे कबूल केल्याप्रमाणे याचिकाकर्त्यापूरती रक्कम १६ ऑगस्ट २०१४ पूर्वी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या नोंदणीशाखेत निश्चितपणे जमा करतील.

**८.** यचिकाकर्त्यांपूरती अशी रक्कम औरंगाबाद खंडपीठाच्या नोंदणी शाखेत १६ ऑगस्ट २०१४ पूर्वी जमा केली म्हणजे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या १८ महिन्यापूर्वीच्या आदेशाचे पूर्णपणे पालन झाले असे होत नाही. अर्जदाराच्या बरोबर तत्सम सर्वांना हा फरक अदा करण्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाचे ३० जानेवारी २०१३ चे आदेश आहेत. ते पुढील शब्दात.:- "As a sequel to the above, we direct that **within three months** from the date of receipt/production of copy of this order, State Government shall pay to the members of the **appellant and other similarly situated employees** difference of the gratuity already paid and enhanced gratuity payable in terms of G.R. dated 21.08.2009. The parties are left to bear their own costs." **याचिकाकर्त्यांच्या बरोबर तत्सम सर्व कर्मचाऱ्यांना हा फरक अदा करावयाचा आहे अशी स्पष्ट शब्द योजना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये आहे.**

**९.** तिकडे "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION WRIT PETITION NO.6369 OF 2013. Shivaji University

## 04/07/2014

ITEM NO.53 COURT NO.11 SECTION IX

### SUPREME COURT OF INDIA

( RECORD OF PROCEEDINGS )

CONTEMPT PETITION (C) No. 277/2014 In CONTEMPT PETITION (C) No. 307/2013 In CIVIL APPEAL No. 908/2013 ASSO. OF COLLEGE & UNIV. SUP. TEACHERS Petitioner(s) ***VERSUS*** SANJAY KUMAR, SECR.HR. & TECH.ED. DEP. & ANR. Respondent(s) (With office report)

**Date : 04/07/2014**

This petition was called on for hearing today.

**: CORAM :**

HON'BLE MR. JUSTICE FAKKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA
HON'BLE MR. JUSTICE A.K. SIKRI

For Petitioner(s) Mr. Amol Nirmalkumar Suryawanshi, Adv. For Respondent(s) Mr. B.H. Marlapalle, Sr. Adv. Ms. Asha Gopalan Nair, Adv. UPON hearing the counsel the Court made the following

**O R D E R**

**The contempt petition is disposed of in terms of the signed order.**

(KALYANI GUPTA) COURT MASTER (SHARDA KAPOOR)

[SIGNED ORDER IS PLACED ON THE FILE.]

### IN THE SUPREME COURT OF INDIA

CIVIL ORIGINAL JURISDICTION

CONTEMPT PETITION (C) NO. 277 OF 2014 IN CONTEMPT PETITION (C) NO. 307 OF 2013
IN CIVIL APPEAL NO. 908 OF 2013

ASSOCIATION OF COLLEGE & UNIVERSITY SUPERANNUATED TEACHERS PETITIONER ***VERSUS*** SANJAY KUAMR, SECRETARY, HIGHER TECHNICAL EDUCATION DEPARTMENT & ANR. ..... ***RESPONDENT***

**O R D E R**

Since counsel has put in appearance for the alleged contemnors and makes a specific statement **that the contemnors** have worked out the aggregate payable to the members of the petitioner-Association which works out to Rs. 32 Crores **tenders unconditional apology as the contemnors have not complied with the direction in making the payment within the due date.**

Learned senior counsel for the contemnors also states that now that the amount payable has been ascertained, the same will definitely be paid within four weeks from today.

In the light of the said statement, the contempt petition stands closed and disposed of in the above terms.

[FAKKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA] [A.K. SIKRI]

NEW DELHI : JULY 04, 2014.

Teachers Association (SUTA), Through Secretary, Dr.R.H. Patil and Ors. ...Petitioners. v/s. The State of Maharashtra, Through the Secretary, Ministry of Higher And Technical Education and Anr. ...Respondents." या प्रकरणात दिनांक ३ सप्टेंबर २०१३ रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयात संघटनेसोबत याचिकाकर्ते असलेल्या १४१ प्राध्यापकांच्या संदर्भात निर्णय झालेला आहे. त्या निर्णयामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहे. :-

"5. Hence, we dispose of this petition, by passing the following order :- (i) We direct the second respondent to scrutinize the cases of the petitioner nos.2 to 142 for grant of benefit in accordance with the Judgment and Order dated 30th January, 2013 of the Apex Court in Civil Appeal No.908 of 2013 ; (ii) .... (iii) We direct the State Government **to take a policy decision** on the basis of the order of the Apex Court dated 30th January, 2013, within a period of four weeks from today." **३ सप्टेंबर २०१३ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय निर्गमित करा असा आदेश दिला या घटनेला जवळजवळ ९-१० महिन्याचा काळ उलटून गेला पण शासनाने तसे केले नाही.**

**१०.** दरम्यानच्या काळात 'नुटा' च्या क्षेत्रातील 125 (81+32+12) प्राध्यापकांनी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल केलेल्या सन २०१३ च्या याचिका (क्रमांक ५८०७, ५८११ व ६४७१ या तीनही याचिका) दिनांक ११ जुलै २०१४ रोजी एकत्रितरित्या सुनावणीस आल्या. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड. फिरदोस मिर्झा यांनी त्यांची बाजू मा. खंडपीठासमोर मांडली. त्या तीनही याचिकामध्ये मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने पुढीलप्रमाणे निर्णय दिला."Since the issue involved in this case stands covered by the judgment in *Special Leave Petition (C) No.3700 of 2012*, *Association of College & University Superannuated Teachers Vs. Union of India and others* dated 30.1.2013, the writ petitions are disposed of with a direction to the State of Maharashtra to pay the amount towards difference of the Gratuity to the petitioners in terms of the Government Resolution dated 21.8.2009, **within a period of three months from the date of receipt of the order.**" मा. खंडपीठाचा हा निर्णय दिनांक ११ जुलै २०१४ रोजी झालेला असल्यामुळे व त्या निर्णयाचा अंमल करण्यासाठी ३ महिन्याची मुदत देण्यात आलेली असल्यामुळे तोपर्यंत वाट पहावी लागणार. मात्र या साऱ्या घडामोडीतून एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते ती अशी की **मा. सर्वोच्च न्यायालयाने किंवा उच्च न्यायालयाने आदेश दिल्यावरही आम्ही काहीच करणार नाही, त्यावर रिव्ह्यु पिटीशन करू, एसएलपी करू, क्युरेटीव्ह पिटीशन करू, या सर्व घटनाक्रमामध्ये कालहरण करू, शेवटी अवमान याचिका दाखल झाल्यावर गती राहीली नाही म्हणून बिनशर्त माफी मागू व मग त्यानंतर काय करायचे ते करू असा धोरणात्मक शासन निर्णयच उच्चशिक्षण विभागाने काढला आहे किंवा काय? अशी शंका येण्याइतपत न्यायालयाप्रती अनादराचा हा विषय आहे. शितावरून भाताची परीक्षा या न्यायाने इतर प्रकरणातील प्रवासाचा अंदाज येण्यास हरकत नाही.**

**११.** राजकीय नेतृत्वामध्ये व नोकरशाहीमध्ये उच्च शिक्षण विभागात शिक्षकांबद्दल अत्यंत द्वेषाचे वातावरण असतांना फक्त याचिकाकर्त्यांपूरता फरक अदा करून हा प्रश्न मिटणार नाही. तत्सम सर्वांना हा फरक अदा करावाच लागेल याची जाणीव असल्यामुळेच काही पावले उचलली गेली असावीत असा संशय घेण्याला थोडीशी जागा आहे. कारण उच्चशिक्षण सचिवांनी या कामी आवश्यक असलेली रक्कम ३२ कोटी रुपये असल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयात नमूद केले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये अतिशय कष्टपूर्वक मेहनतीने हे यश मिळविलेल्या संघटनेनी आपल्या प्रसिद्धी पत्रकात याचिकाकर्त्यांची संख्या ही १२९ सांगितलेली आहे. प्रत्येक लाभ धारकाला मिळणारा लाभ निश्चित असून तो रुपये २ लक्ष इतका आहे. त्या हिशेबाने विचार करू जाता ही रक्कम ३ कोटीच्या आतच असू शकते. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये या कामासाठी ३२ कोटी रुपये नमूद करतांना लाभ धारकांची संख्या १६०० गृहीत धरण्यात आलेली आहे हे स्पष्टपणे दिसून येते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार अशा सेवानिवृत्तांची संख्या १३०० ते १४०० च्या घरात आहे. अर्थात ही स्वयंसेवी यंत्रणाकडून मिळालेली माहिती असून तिला सरकारी अधिकृतेचा दर्जा नाही हे उघडच आहे.

**१२.** मात्र या ३२ कोटी रुपयाच्या रक्कमेबाबत उच्च शिक्षण सचिवांनी केलेला "the contemnors have worked out the aggregate payable to the **members of the petitioner-Association** which works out to Rs. 32 Crores" हा उल्लेख मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ४ जुलै २०१४ च्या आदेशात नमूद आहे. ही ३२ कोटी रुपयाची रक्कम याचिकाकर्त्या संघटनेच्या सदस्यापुरतीच काढण्यात आलेली असेल **तर इतर सर्व तत्सम शिक्षकांना याचिका व अवमान याचिका दाखल करण्याशिवाय पर्याय नाही. हे सर्वांनीच लक्षात ठेवले पाहीजे.**

गेल्या महिन्या दोन महिन्यात घडलेल्या या सर्वच घटना शासनाची या सर्वच प्रश्नाकडे पहाण्याची वृत्ती स्पष्ट करतात. त्यामुळे संघटनेतर्फे मुद्दाम सर्वांच्या लक्षात आणून देण्यासाठी ही माहिती प्रसृत केलेली आहे.

- **डॉ. प्रवीण रघुवंशी**, अध्यक्ष 'नुटा'

## 16/07/2014

ITEM NO.MM1 COURT NO.9 SECTION IX

## SUPREME COURT OF INDIA

RECORD OF PROCEEDINGS CONMT. PET. (C) NO. 277 / 2014 IN CONMT. PET. (C) NO. 307 /2013 IN C.A. NO. 908 / 2013 ASSOCIATION OF COLLEGE & UNIVERSITY SUPERANNUATED TEACHERS Petitioner(s) ***VERSUS*** SANJAY KUMAR, SECRETARY, HIGHER TECHNICAL EDUCATION DEPARTMENT & ANR. Respondent(s)

**Date : 16/07/2014**

This petition was mentioned today.

**: CORAM :**

HON'BLE MR. JUSTICE FAKKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA

HON'BLE MR. JUSTICE SHIVA KIRTI SINGH

For Petitioner(s) Mr. Amol Nirmalkumar Suryawanshi,Adv. For Respondent(s) Mr. B.H. Marlapalle,Sr.Adv. Mrs. Asha G. Nair,Adv.

UPON being mentioned the Court made the following

### O R D E R

On a mention made by the counsel for the parties, we direct that the statement recorded in para 2 of our order dated 04.07.2014 stands corrected to the effect that the amount ascertained will be deposited with the Registry of the Bombay High Court, Aurangabad Bench, within four weeks.

(NARENDRA PRASAD) COURT MASTER (SHARDA KAPOOR)
[SIGNED ORDER IS PLACED ON THE FILE.]

## IN THE SUPREME COURT OF INDIA

CIVIL ORIGINAL JURISDICTION

CONTEMPT PETITION (C) NO.277 OF 2014 IN CONTEMPT PETITION (C) NO.307 OF 2013 IN CIVIL APPEAL NO.908 OF 2013 ASSOCIATION OF COLLEGE & UNIVERSITY SUPERANNUATED TEACHERS Petitioner(s) ***VERSUS*** SANJAY KUMAR, SECRETARY, HIGHER TECHNICAL EDUCATION DEPARTMENT & ANR. Respondent(s)

### O R D E R

On a mention made by the counsel for the parties, we direct that the statement recorded in para 2 of our **order dated 04.07.2014 stands corrected to the effect that the amount ascertained will be deposited with the Registry of the Bombay High Court, Aurangabad Bench, within four weeks.**

[FAKKIR MOHAMED IBRAHIM KALIFULLA]

[SHIVA KIRTI SINGH]

NEW DELHI : JULY 16, 2014.

# MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

**University Club House, B-Road, Churchgate, Mumbai 400 020**

## 31st JULY 2014

**Smt. Smriti Irani**
Hon'ble Minister for Human Resource Development
Government of India Shastri Bhavan, New Delhi.

Hon'ble Minister, Madam,

1. On behalf of Maharashtra Federation of University & College Teachers' Organizations (MFUCTO), as its General Secretary, I am constrained to write this letter in connection with the non-implementation of directions issued by the University Grants Commission as accepted by the HRD Ministry in 2011 and 2012. The said directions were in respect of counting of total service for all purposes of the University and College teachers appointed between 19th September 1991 and 3rd April 2000 in Maharashtra after three Ld Division Benches of the Hon'ble Bombay High Court had referred the matter to the UGC for final decision. The Government of Maharashtra attempted to introduce NET/SET retrospectively on them. In fact, Government of India, Ministry of HRD Department of Higher Education, Shastri Bhavan, New Delhi, had, through D.O letter No.B-7/2010-U.I.(A) dated 3rd November 2010 of Sunil Kumar, Additional Secretary, HE, addressed to Dr. Kazmi, the then Secretary of UGC, asserted that "these regulations are bound to be prospective only. Appointments can never be made with retrospective date." There are more than 8000 teachers who are covered by this UGC direction communicated to the Government of Maharashtra and also to the MFUCTO through UGC letters dated 16th and 26th August 2011 and 15th March 2012. Hereto annexed and marked as **ANNEXURES 1. 2 & 3** are the said letters.

2. Apart from the failure to act on the UGC directions, the Government of Maharashtra has also failed to act on more than twenty Judgments of the Hon'ble Bombay High Court, some of which have been taken to the Hon'ble Supreme Court by the Government itself and lost. The most serious of this is the contempt being committed by the State Government on the interim order from the Hon'ble Supreme Court of India in Special Leave Petition No.34118 of 2013 filed by the State against the Judgment of the Hon'ble Aurangabad Bench of the Bombay High Court in W.P. No.11477 of 2010. Enclosed hereto and marked as **Annexure 4** is a copy of the said interim Order of the Hon'ble Supreme Court of India in the SLP. Enclosed hereto and marked as **Annexure 5** is a List of the Judgments of the Hon'ble Bombay High Court which have yet to be complied by the government though the time limit set for compliance has expired long time ago.

3. The acts of omission and commission on the part of Government of Maharashtra not only amounts to neglecting to accept the UGC directions but also refusing to uphold the dignity of judicial process, though a constitutional mandate. This has resulted in continuation of injustice on the teaching community that has gone on since the nineties.

4. In view of the peculiar situation created in the State MFUCTO was compelled to submit to the Hon'ble President of India a detailed Petition dated 20th June 2014 pointing out the government's utter disregard of Hon'ble Court decisions indicative of constitutional break-down in our State. A copy of the Memorandum dated 20th June 2014 was also handed over to the Hon'ble Union Minister for Home, Shri Rajnathji Singh by the MFUCTO at a brief meeting held with him on 21st June 2014. MFUCTO is confident that the Hon'ble Union Home Minister must have acted positively to ascertain the factual position from Government of Maharashtra as a part of the democratic process.

5. As the new HRD Minister you will surely be aware that in respect of the pay commission recommendations the central government contributes 80% of the total additional expenditure of the State Governments. This practice has been followed by the central government while accepting and recommending the sixth pay commission revised scales of pay with the condition of releasing the 80% central share to the State Government only if the State Governments implemented the entire package. In respect of the sixth pay commission scales of pay also such decision of 80% assistance to the State was taken by the central government. This was communicated by Central Orders through letter No. F.1-7/2010-U-II, dated 14th August 2012. There was a special clause in the central directive that arrears will be payable to all those who were in service on 1.1.2006. In para. 3 of the said letter it was clearly set out as under:

"3. Central Government decided to provide financial assistance to the extent of 80% as reimbursement to those State Governments, which may opt for these revised pay scales for the period 1-1-2006 to 31-3-2010. The remaining 20% was to be met by the State Government from its own resources."

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD**

CONT. PETITION NO. 252 OF 2014
IN WP/10346/2013
WITH
CP/262/2014 IN WP/641/2014
WITH
CP/263/2014 IN WP/6687/2013
WITH
CP/264/2014 IN WP/7605/2013
WITH
CP/265/2014 IN WP/1129/2014
WITH
CP/266/2014 IN WP/642/2014
WITH
CP/267/2014 IN WP/7421/2013

SANJAY RATAN KHAIRNAR AND OTHERS
**VERSUS**
SANJAYKUMAR AND OTHERS

Advocate for Petitioners : Mr. Yashodeep Deshmukh and Mr. Yogesh P. Deshmukh AGP for Respondents: Mr. A. V. Gondhalekar,

**CORAM :**
**S. V. GANGAPURWALA & A. M. BADAR, JJ.**
**DATE : 8th August, 2014**
**PER COURT :**

1. Mr. Gondhalekar, learned AGP states that respondent No.2 has instructed the AGP that the proposal has to come through management after completing all the formalities and thereafter only, it would be possible to processes the same as per the directions of this court.

2. Leave to add management as party.

3. Notice to added respondent, returnable on 22.08.2014. Hamdast allowed.

**(A.M.BADAR, J.) (S. V. GANGAPURWALA, J.)**

नेटसेट प्रकरणी दाखल झालेल्या अवमान याचिकांची सद्यस्थिती

6. The MFUCTO submits that the teachers whose cases were dealt with by the UGC appointed between 19-9-1991 to 3-4-2000 are still in service and hence their posts existed as on 1-1-2006. They are eligible for arrears arising out of the implementation of the sixth pay commission revised scales of pay. If their arrears are calculated by the State Government based on their basic pay as Assistant Professors without giving to them the placement benefits, it would be in gross violation of the Hon'ble Supreme Court interim order on the SLP filed by the Government of Maharashtra and also against the UGC directions. In fact, after the Hon'ble Supreme Court passed its interim order, several dozens of Petitions have been disposed of by the Bombay High Court taking cognizance of the Hon'ble Supreme Court interim order and directed the State Government to complete the process of granting Placement benefits to the Petitioners and release arrears arising thereof.

7. It has been the continuing request of MFUCTO on behalf of the 30,000 University and College teachers in the State of Maharashtra that the State Government should release full arrears of all the teachers who were in service as on 1-1-2006 including the NET/SET affected teachers whose cases fall under the Hon'ble Supreme Court interim order and UGC directions dated 16th and 26th August 2011 and 3rd March 2012.

8. In view of the facts set out hereinabove, The Central Government may take departmental care to ensure that the Government of Maharashtra is paid 80% of the total additional expenditure by way of reimbursement only after the release of arrears in respect of all the teachers who were in service as on 1-1-2006.

7. It has been the continuing request of MFUCTO on behalf of the 30,000 University and College teachers in the State of Maharashtra that the State Government should release full arrears of all the teachers who were in service as on 1-1-2006 including the NET/SET affected teachers whose cases fall under the Hon'ble Supreme Court interim order and UGC directions dated 16th and 26th August 2011 and 3rd March 2012.

8. In view of the facts set out hereinabove, the Central Government may

(A) direct the State Government to complete the process of Placement as is mandated by

(i) HRD Order dated 3rd November 2010 to the UGC;

(ii) UGC directives contained in letters dated 16th, 26th August and 15th March 2012 enclosed hereto as Annexures 1, 2 & 3

(iii) Order dated 18-11-2013 of the Hon'ble Supreme Court of India in SLP No.34118/2013 enclosed hereto as Annexure 4; and

(iv) Judgments and Orders passed by different Division Benches of the Hon'ble Bombay High Court, a list of which is enclosed as Annexure 5.

(B) direct Government of Maharashtra to fully comply with the orders of the Hon'ble Supreme Court of India and the Hon'ble Bombay High Court especially in respect of non-NET/SET teachers recruited during the period from 19-9-1991 to 3-4-2000.

The Union HRD Ministry should take departmental care to ensure that the Government of Maharashtra is paid 80% of the total additional expenditure by way of reimbursement only after the State Government has acted in terms above-stated and releases arrears in respect of all the teachers who were in service as on 1-1-2006.

Thanking you,

Yours faithfully

(Dr. Tapati Mukhopadhyay) (A.T. Sanap)

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

## कुंठित वेतनवाढीच्या रिकव्हरीग्रस्त प्राध्यापकांची सभा

विधिमयरित्या देण्यात आलेल्या कुंठित वेतनवाढीची रिकव्हरी काढण्याचा फार मोठा उद्योग उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी हाती घेतलेला आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या सहा खंडपीठांनी शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिले. मा. सर्वोच्च न्यायालयाने शासनाची एसएलपी डिसमिस केली. पण हे रिकव्हरीचे भूत मानगुटीवरून उतरण्याचे नाव घेत नाही.

२. मा. नागपूर खंडपीठाने एका (५८९२/२०१२) प्रकरणात ५२ शिक्षकांना न्याय दिला. त्यानंतर अवमान याचिका दाखल करावी लागली. हे सारे शिक्षक सेवानिवृत्त असल्याने आता घरोघरी परतावा नेऊन देण्यात आला आहे. पण त्याचबरोबर याच क्षेत्रात रिकव्हरी सुरूच होती. परिणामी आणखी २० प्राध्यापकांना मा. नागपूर खंडपीठापुढे जावे लागले. त्याप्रकरणी (६४७२/२०१३) दिनांक ४ ऑगस्ट २०१४ रोजी या शिक्षकांच्या बाजूने निर्णय झाला. तीन महिन्यात रिकव्हरीची रक्कम परत केली नाही तर अवमान याचिका दाखल करावी लागेल. याच क्षेत्रात आणखी काही रिकव्हरीग्रस्त शिक्षकांना सन २०१४ ची याचिका क्रमांक २२१५ मा. नागपूर खंडपीठापुढे दाखल करावी लागली आहे.

३. उपरोक्त परिच्छेद दोन मध्ये नमूद केलेल्या शिक्षकांव्यतिरिक्त इतर अनेक शिक्षक रिकव्हरीग्रस्त आहेत असे आढळून आले आहे. कुंठित वेतनवाढीच्या अशा नागपूर व अमरावती विभागातील रिकव्हरीग्रस्त शिक्षकांच्या सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सभेचा दिवस, दिनांक, वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे.

| तक्ता |
|---|
| **सभेचे ठिकाण :** शिक्षक भवन, अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती |
| **सभेचा दिवस व दिनांक :** रविवार, दिनांक २१ सप्टेंबर २०१४ |
| **सभेची वेळ :** दुपारी ३.०० वाजता |

उभय विद्यापीठ क्षेत्रातील सर्व संबंधित शिक्षकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO.** MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.09.2014**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

To,......................................................................

......................................................................

......................................................................

......................................................................